आरेतील १७७ झाडांवर कुऱ्हाड
पालिका आयुक्तांच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान

मुंबई : आरे दुग्ध वसाहतीत बांधण्यात येणाऱ्या 'मेट्रो ३' प्रकल्पाच्या कारशेडसाठी अतिरिक्त १७७ झाडे तोडण्यासाठी महानगरपालिका आयुक्तांनी परवानगी दिली आहे. या निर्णयाविरोधात पर्यावरणप्रेमींनी पुन्हा एकदा उच्च न्यायालयात धाव घेतली असून न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारी ठेवली आहे.

कारशेडसाठी अतिरिक्त ८४ झाडे तोडण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिलेली असताना महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाकडे १७७ झाडे तोडण्याची परवानगी मागण्यात आल्याचा दावा याआधी पर्यावरणप्रेमींनी केला होता. तसेच त्याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र त्या वेळी या वादामध्ये हस्तक्षेप करण्यास न्यायालयाने नकार दिला होता. सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण प्रलंबित असल्याने या प्रकरणी तिथेच किंवा वृक्ष प्राधिकरणाकडे दाद मागण्याची सूचनाही न्यायालयाने याचिकाकर्ते झोरू बाथेना यांना केली होती.

अँटिलिया स्फोटके प्रकरण
'परमबीर सिंह यांच्याविरोधात कोणताही पुरावा नाही'

मुंबई : उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाबाहेर सापडलेली स्फोटके आणि व्यावसायिक मनसुख हिरेन हत्या प्रकरणात मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांचा सहभाग असल्याचा कोणताही पुरावा आढळून आला नाही, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच परमबीर यांच्या प्रकरणातील सहभागाची चौकशी करण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली. परमबीर यांच्याविरोधात आरोप करणारी याचिका ही ऐकीव माहितीवर आधारित असल्याची टिप्पणीही न्यायमूर्ती सुनील शुक्रे आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने याचिका फेटाळताना केली.

अँटिलिया निवासस्थानाबाहेर सापडलेली स्फोटके आणि व्यावसायिक मनसुख हिरेन मृत्यू प्रकरणातील तत्कालीन पोलीस आयुक्त परमबीर यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते परशुराम शर्मा यांनी याचिकेतून केली होती. आपल्याला या प्रकरणाबाबत माहिती असून परमबीर हे आरोपींपैकी एक असण्याची शक्यता आहे, असा दावा शर्मा यांनी याचिकेत केला होता. सुरुवातीला याचिकाकर्त्याच्या माहितीचा स्रोत फक्त वर्तमानपत्रातील बातम्या होत्या. परंतु नंतर याचिकाकर्त्यांनी माहिती गोळा केल्यानंतर परमबीर यांचा सहभाग असण्याची शक्यता वर्तवली असल्याचे याचिकेत म्हटले होते.

मुंबई सेंट्रल टर्मिनसच्या नामांतराचा प्रस्ताव

नवी दिल्ली : मुंबई सेंट्रल टर्मिनसचे नाव नाना शंकरशेट टर्मिनस करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारकडून केंद्राला प्राप्त झाला आहे. मात्र अद्याप त्यावर कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, अशी माहिती केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी मंगळवारी लोकसभेत दिली. अशा प्रकरणांमध्ये विविध सरकारी संस्थांच्या शिफारशी आणि इतर संबंधित घटकांचा योग्य विचार करून निर्णय घेतला जातो, असे राय म्हणाले. या संदर्भात मुंबईतील नामदार जगन्नाथ (नाना) शंकरशेट प्रतिष्ठानकडून केंद्र सरकारला कोणतेही निवेदन मिळालेले नाही, असे मंत्री म्हणाले.

रेल्वे मंत्रालय, पोस्ट विभाग आणि भारतीय सर्वेक्षण विभाग यांच्याकडून ना-हरकत घेतल्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालय कोणत्याही ठिकाणाचे किंवा स्थानकाचे नाव बदलण्यास संमती देते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

धरणांत फक्त ३७ टक्के पाणीसाठा
जून-जुलैच्या पावसावर पाणीपुरवठ्याची मदार

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : ऑक्टोबरपर्यंत पाऊस होऊनही यंदा मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणीसाठा गेल्या वर्षीच्या तुलनेत खालावला आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही तलावांत सध्या ३७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. सध्या पाणी कपातीची शक्यता नसली तरी जून व जुलैमध्ये पाऊस किती पडतो यावर पाणीपुरवठ्याचे नियोजन ठरणार आहे. पावसाचे आगमन लांबल्यास मात्र पाणी कपातीची वेळ मुंबईवर येऊ शकेल. उन्हाचा ताप हळूहळू वाढू लागला आहे.

एप्रिल महिना जवळ आला की मुंबईकरांनाही पाणी कपातीची चिंता भेडसावू लागते. गेल्या वर्षी पाऊस चांगला झाला व मुंबईला पाणीपुरवठा करणारी धरणे काठोकाठ भरली होती. ऑक्टोबरच्या अखेरीस धरणांमध्ये ९७ टक्के पाणीसाठा होता. त्यामुळे पाण्याची वर्षभराची चिंता मिटली असे वाटत होते. मात्र अद्याप एप्रिल महिना सुरूही झालेला नसताना धरणांतील पाणीसाठा ३७ टक्क्यांवर आला आहे. उन्हाळ्याचे दोन महिने व पुरेसा पाऊस सुरू होईपर्यंतचे दोन महिने असे चार महिने याच पाणीसाठ्यावर मुंबईकरांची मदार असणार आहे. गेल्या वर्षी याच वेळी ४० टक्के पाणीसाठा शिल्लक होता. ऊर्ध्व वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार, तुळशी अशा सात धरणांतून मुंबईला दर दिवशी ३८०० दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. सातही तलावांतील पाणीसाठा १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटरवर पोहोचल्यानंतर मुंबईकरांना पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करणे शक्य होते. तसेच तलावांतील उपलब्ध पाणीसाठा ३१ जुलैपर्यंत पुरेल या दृष्टीने पालिकेच्या जल अभियंता खात्याद्वारे नियोजन केले जाते. सर्व तलाव १ ऑक्टोबरला पूर्ण क्षमतेने भरले असले तर वर्षभर पाणीपुरवठा सुरळीत राहतो. तलाव पूर्ण क्षमतेने भरले नाहीत तर पाणी कपात करण्याची वेळ येते. या वर्षी अजून तरी पाणी कपातीची शक्यता नसली तरी जून व जुलैमध्ये किती पाऊस पडतो त्यावर मुंबईच्या पाणीपुरवठ्याचे भविष्य असेल.

पाणीसाटा असा...

२८ मार्च २०२३	५,४५,१९८ दशलक्ष लिटर	३७.६७ टक्के
२८ मार्च २०२२	५,९१,५८१ दशलक्ष लिटर	४०.८७ टक्के
२८ मार्च २०२१	५,४१,७१२ दशलक्ष लिटर	३७.४३ टक्के

आता 'डिजीलॉकर'मध्ये विवाह नोंदणी प्रमाणपत्र
२८ जानेवारी २०१६ नंतर विवाह नोंदणी केलेल्यांना सुविधेचा लाभ

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : केंद्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाचा उपक्रम असलेल्या 'डिजीलॉकर' या ऑनलाइन शासकीय व अधिकृत कागदपत्रांच्या ॲपमध्ये आता मुंबईकर नागरिकांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र ऑनलाइन प्राप्त करून जतन करता येईल. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे २८ जानेवारी २०१६ नंतर विवाह नोंदणी केलेल्यांना ही सुविधा मिळणार आहे.

विवाह नोंदणी प्रमाणपत्र हा विवाहितांसाठी महत्वाचा वैयक्तिक दस्तऐवज समजला जातो. पासपोर्ट, व्हिजा आणि इतर अनेक शासकीय कामकाजासाठी विवाह नोंदणी प्रमाणपत्राची गरज भासते. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे २०१० पासून विवाह नोंदणी प्रमाणपत्र विषयक कामकाज सुरू झाले असले तरी जानेवारी २०१६ पासून विवाह नोंदणी प्रमाणपत्रांचे कामकाज ऑनलाइन करण्यात आले. आता महापालिकेकडून विवाह नोंदणी प्रमाणपत्र डिजीलॉकरमध्ये देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे विवाह नोंदणी प्रमाणपत्र प्रत्यक्ष बाळगण्याची गरज भासणार नाही. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) आश्विनी भिडे यांच्या हस्ते या सुविधेचे मंगळवारी लोकार्पण करण्यात आले. महापालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक शरद उघडे यावेळी उपस्थित होते. विवाह नोंदणी प्रमाणपत्रांचे कामकाज ऑनलाइन झाल्याच्या तारखेपासून म्हणजे २८ जानेवारी २०१६ नंतर पालिकेकडे विवाह नोंदणी केलेल्यांना ही सुविधा मिळणार आहे. आजपर्यंत पालिकेकडे वैवाहिक नोंदणीची संख्या तीन लाख ८० हजार ४९४ आहे.

नायर रुग्णालयात रुग्णाची आत्महत्या

मुंबई : यशस्वी ॲजिओप्लास्टी झाल्यानंतर उत्तम प्रकृती असल्याने मंगळवारी घरी सोडण्यात येणाऱ्या अविनाश सावंत (४०) या रुग्णाने नायर रुग्णालयात दुसऱ्या मजल्यावरील शौचालयाच्या खिडकीतून खाली उडी मारून आत्महत्या केली. आत्महत्येमागील कारण स्पष्ट झाले नसले तरी आजारपणामुळे त्याने आत्महत्या केली असावी, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला. या प्रकरणी आग्रीपाडा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

मूळचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंत यांना हृदयविकाराचा त्रास असल्याने १ फेब्रुवारी त्यांना नायर रुग्णालयात दाखल करण्यात आले. १५ मार्चला त्यांची यशस्वी ॲजिओप्लास्टी करण्यात आली. त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत असल्याने डॉक्टरांनी त्यांना मंगळवारी घरी सोडण्याचा निर्णय घेतला होता. मात्र मंगळवारी सकाळी ८.३० मिनिटांनी त्यांनी आत्महत्या केली. शवविच्छेदन अहवालामध्ये त्यांच्या मेंदूला गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

राहुल गांधींवरील कारवाईचे प्रकरण गांभीर्याने घेण्याची गरज
माजी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी यांचे वक्तव्य

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : काँग्रेस नेते राहुल गांधी यांना सुरत न्यायालयाने दोषी ठरवून दोन वर्षांची शिक्षा सुनावल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांची खासदारकीही रद्द करण्यात आली. मात्र हे प्रकरण गांभीर्याने घेण्याची गरज असून त्यातून लोकशाहीला एकप्रकारे धोका निर्माण झाल्याचे मत उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी यांनी मंगळवारी व्यक्त केले.

या प्रकरणाच्या निमित्ताने देशपातळीवर नेत्यांचा, प्रतिस्पर्धींचा पर्याय पुसून टाकला जात आहे का, प्रमुख पक्षांच्या नेत्यांच्या मनात गांधी यांच्यावरील कारवाईप्रमाणे भीती निर्माण केली जात आहे का, देशात अघोषित आणीबाणी सुरू आहे का किंवा आपण हुकुमशाहीच्या दिशेने वाटचाल करत आहोत, अशा प्रश्नांचा विचार करण्याची वेळ आल्याकडेही न्यायमूर्ती धर्माधिकारी यांनी लक्ष वेधले. अशी स्थिती निर्माण होणे ही लोकशाहीसाठी हानी आहे. वयाच्या ५२व्या वर्षी राजकीय जीवनातून अशाप्रकारे बाहेर पडावे लागत असल्यास ते लोकशाही, स्वतंत्र निवडणूक आणि त्या प्रणालीसाठी आव्हान असल्याचेही त्यांनी यावेळी प्रामुख्याने स्पष्ट केले.

राहुल गांधी यांना सुरत येथील न्यायालयाने सुनावलेली शिक्षा आणि लगेचच त्यांचे लोकसभेतील सदस्यत्व रद्द करणे या सगळ्या पार्श्वभूमीवर न्या. धर्माधिकारी यांचे भाषण 'मुंबई सर्वोदय मंडळा'ने आयोजित केले होते. त्यावेळी न्या. धर्माधिकारी यांनी देशातील स्थिती गांभीर्याने घेण्याची गरज बोलून दाखवली.

'चुका आणि गाफील राहण्याचे परिणाम'

राहुल यांनी वारंवार त्याच चुका केल्या. त्यातून शिकण्याचा प्रयत्न केला नाही. गाफील राहण्याच्या परिणामांना राहुल यांना सामोरे जावे लागत आहे, असे परखड मतही न्या. धर्माधिकारी यांनी यावेळी व्यक्त केले. एखाद्या मृत व्यक्तीच्या विशेषतः स्वातंत्र्यलढ्यात विशेष योगदान असलेल्या व्यक्तीबाबत वारंवार विधाने करणे योग्य नाही. महाराष्ट्रात येऊन राहुल यांनी तेच केले. एखादा मृत पुढारी अथवा देशभक्ताबाबत बोलताना भान ठेवून बोलावे. अभ्यास अथवा योग्य संदर्भ न लावता त्यांच्यावर पळपुटा, माफी मागण्याची सवय असल्याची वक्तव्य करू नये. असे व्यक्तव्य म्हणजे एखाद्या नवीन खटल्याला सामोरे जाण्याचे द्योतक असू शकते, अशी टिप्पणीही न्या. धर्माधिकारी यांनी केली. निवडणुकीच्या प्रचारात जाहीर सभेत बोलणे हा विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग आहे. परंतु तिथे पुराव्याविना बोलले जाते. बोलताना तारतम्य बाळगले जात नाही हे खेदजनक असल्याचेही न्या. धर्माधिकारी म्हणाले.

राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण मुंबई खंडपीठ – २

सी.पी. (सीएए)/ ६४/एमबी/२०२३
सी.ए. (सीएए)/१२५/एमबी/२०२२ शी संबंधित

कंपनी कायदा, २०१३ च्या प्रकरणी
व
कंपनी कायदा, २०१३ चे अनुच्छेद २३० ते २३२ व कंपनी कायदा, २०१३ च्या अन्य लागू तरतुदी तसेच त्याअंतर्गत संस्थापित नियम व विनियमनांच्या प्रकरणी
व
डीएचएल ईकॉमर्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड (''विलीन कंपनी'' वा ''प्रथम याचिकाकर्ती कंपनी'') सीआयएन : U60300MH2021PTC356741 या कंपनीचे डीएचएल सप्लाय चेन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (''प्रभावी कंपनी'') वा ''द्वितीय याचिकाकर्ती कंपनी''), सीआयएन – U74120MH2013PTC242240 व त्यांचे संबंधित भागधारक यांच्यासमवेत व्यवस्थेच्या योजनेच्या (योजना) प्रकरणी

डीएचएल ईकॉमर्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड कंपनी कायदा, २०१३ च्या तरतुदींअंतर्गत संस्थापित एक कंपनी, त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : ७०२, ७ वा मजला, टॉवर बी, २४७ पार्क, एल. बी. एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई – ४०० ०८३. सीआयएन : U60300MH2021PTC356741 } ..... प्रथम याचिकाकर्ती कंपनी/ विलीन कंपनी

डीएचएल सप्लाय चेन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनी कायदा, १९५६ च्या तरतुदींअंतर्गत संस्थापित एक कंपनी, त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : ७०२, ७ वा मजला, टॉवर बी, २४७ पार्क, एल. बी. एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई – ४०० ०८३. सीआयएन : U74120MH2013PTC242240 } ...द्वितीय याचिकाकर्ती कंपनी/ प्रभावी कंपनी

(विलीन कंपनी व प्रभावी कंपनी एकत्रितरीत्या याचिकाकर्ती कंपन्या वा याचिकाकर्ते म्हणून उल्लेखित)

कंपनी याचिकेच्या सुनावणीची सूचना

डीएचएल ईकॉमर्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड (''विलीन कंपनी'' वा ''प्रथम याचिकाकर्ती कंपनी'') या कंपनीचे डीएचएल सप्लाय चेन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (''प्रभावी कंपनी'') वा ''द्वितीय याचिकाकर्ती कंपनी'') व त्यांचे संबंधित भागधारक यांच्यासमवेत व्यवस्थेच्या योजनेच्या मंजुरीकरिता कंपन्या कायदा, २०१३ चे अनुच्छेद २३० ते २३२ व अन्य लागू तरतुदींअंतर्गत याचिका सादर करण्यात आली होती जी राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (न्यायाधिकरण) यांच्याद्वारे दि. ०७.०३.२०२३ रोजी स्वीकारण्यात आली आहे व सदर याचिका अंतिम सुनावणीसाठी न्यायाधिकरणासमक्ष दि. २१.०४.२०२३ रोजी निश्चित करण्यात आली आहे.

कंपनी योजना याचिकेस समर्थन वा विरोध दर्शवू इच्छिणाऱ्या व्यक्तीने त्याच्या हिताचे स्वरूप, त्याच्याद्वारे वा त्याच्या वकिलाद्वारे स्वाक्षरी करून, त्याचे संपूर्ण नाव व पत्त्यासह अशा सूचनेसमवेत याचिकाकर्त्या कंपन्यांच्या वकिलांकडे पत्ता ३०९, न्यू बेक हाऊस, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, काळा घोडा, फोर्ट, मुंबई – ४०० ००१ येथे तसेच न्यायाधिकरणाकडे पत्ता : ४ था मजला, टेलिफोन एक्सचेंज, जी. डी. सोमानी मार्ग, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५ येथे याचिकेच्या सुनावणीच्या वरील निर्देशित निश्चित तारखेच्या किमान २ (दोन) दिवस अगोदरपर्यंत पाठवावी. एखाद्या व्यक्तीचा याचिकेस विरोध असल्यास विरोधाची पार्श्वभूमी वा त्याच्या प्रतिज्ञापत्राची प्रत अशा सूचनेसमवेत पाठवावी.

एखाद्या व्यक्तीस याचिकेची प्रत हवी असल्यास त्याकरिताचे विहित शुल्क प्रदान करून सर्व परिशिष्टांसमवेत कंपनी योजना याचिकेची प्रत याचिकाकर्ती कंपन्यांच्या वकिलांकडून कंपनी योजना याचिकेच्या सुनावणीच्या निश्चित केलेल्या तारखेच्या किमान २ (दोन) दिवस अगोदरपर्यंत कोणत्याही कार्यदिवसात (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळता) स. ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत प्राप्त करता येऊ शकेल.

याचिकाकर्ती कंपन्यांकरिता
सही/–
जयंत मेंघानी
संचालक
डीआयएन : ०६५१९६८५

दिनांक : २९.०३.२०२३
ठिकाण : मुंबई

एस्सार पॉवर (झारखंड) लिमिटेड – परिसमापनामध्ये
यू31101डीएल2005पीएलसी211274

ई – लिलाव विक्री सूचना

मालमत्तेची विक्री

एस्सार पॉवर (झारखंड) लिमिटेडच्या तोरी, जि. लाथेर, झारखंड येथे स्थित जंगम आणि स्थावर मालमत्ता समाविष्ट निर्माणाधीन थर्मल पॉवर प्लांट (२ x ६०० मे. वॅ.) ची मालमत्ता आणि कोलकाता येथील ४ कंटेनर फ्रेट स्टेशन्स (सीएफएस) येथील अर्थात सेंचुरी जेजेपी, सेंट्रल वेअरहाऊसींग कॉर्पोरेशन, कंटेनर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड आणि सेंचुरी सोनाई येथे स्थित जंगम मलामत्ता विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत.

ई–लिलाव ०२ मे, २०२३ रोजी दु. ३ ते दु. ४ पर्यंत **www.eauctions.co.in** च्या वेब पोर्टलवर होईल.

अधिक माहितीसाठी +९१ ८८२८५ ७६१९७ येथे संपर्क करा किंवा epjl.lq@gmail.com येथे ईमेल करा. विस्तृत विक्री सूचना संकेतस्थळ **www.eauctions.co.in** वर अपलोड करण्यात आली आहे.

एस्सार पॉवर (झारखंड) लिमिटेड – परिसमापनामध्ये करिता
हुजेफा फक्रि सिताबखान, परिसमापक
IBBI/IPA-001/IP-P00031/2017-18/10115
अभिहस्तांकनाची प्राधिकृती २३ डिसेंबर, २०२३ पर्यंत वैध आहे
huzefa.sitabkhan@gmail.com, epjl.lq@gmail.com

दिनांक : २९ मार्च, २०२३
स्थळ : मुंबई

CEAT
सीएट लिमिटेड

सीआयएन: एल२५१००एमएच१९५८पीएलसी०११०४१
नोंदणीकृत कार्यालय: ४६३, डॉ. ॲनी बेसेंट रोड, वरळी, मुंबई – ४०० ०३०
फोन: +९१ २२ २४९३ ०६२१; **फॅक्स:** +९१ २२ २४९३ ८९३३
ईमेल: investors@ceat.com; **वेबसाइट:** www.ceat.com

टपाल मतदान आणि ई-मतदानाबाबत सूचना

याद्वारे **नोटीस** देण्यात येते की, कंपनी कायदा २०१३ ('कायदा') चे कलम १०८ आणि ११० आणि त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांच्या एकत्रित वाचनासह कंपनी व्यवहार मंत्रालयाने ('एमसीए') एप्रिल ८, २०२० ला निर्गमित केलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र.१४/२०२०, एप्रिल १३, २०२० ला निर्गमित केलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र.१७/२०२०, जून १५, २०२० ला निर्गमित केलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र.२२/२०२०, सप्टेंबर २८, २०२० ला निर्गमित केलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र.३३/२०२०, डिसेंबर ३१, २०२० ला निर्गमित केलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र. ३९/२०२०, जानेवारी १३, २०२१ ला निर्गमित केलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र. २/२०२१, जून २३, २०२१ ला निर्गमित केलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र.१०/२०२१, डिसेंबर ८, २०२१ ला निर्गमित केलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र. २०/२०२१, मे ५, २०२२ ला निर्गमित केलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र. ३/२०२२ आणि डिसेंबर २८, २०२२ ला निर्गमित केलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र. ११/२०२२ (यापुढे 'एमसीए परिपत्रके' असा एकत्रित उल्लेख), सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टींग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिसक्लोजर रिक्वायरमेंटस्) नियमावली, २०१५ ('सेबी लिस्टींग रेग्युलेशन्स') मधील नियम क्रमांक ४४, भारतीय कंपनी सचिव संस्थेने सर्वसाधारण बैठकींकरिता जारी केलेले मापदंड ('एसएस–२') आणि कायद्यातील लागू असलेल्या विविध तरतुदी, नियम, नियमावली, परिपत्रके आणि अधिसूचना (कोणत्याही वैधानिक सुधारणा, स्पष्टीकरणे, बदल अथवा फेरकायदे जे वेळोवेळी अंमलात आलेले आहेत यासह) यांच्या तरतुदीनुसार सिएट लिमिटेड ('द कंपनी'), आपल्या सदस्यांची दि. मार्च २०, २०२३ च्या टपाल मतदान नोटीसमध्ये ('नोटीस') नमूद करण्यात आलेल्या ठरावांवरील मान्यता टपाल मतदानाच्या माध्यमातून, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ('सीडीएसएल') द्वारे इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मद्वारे, केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदानाच्या ('दूरस्थ ई–मतदान') मागणे सुविधा सदस्यांना मतदान करण्यासाठी प्रदान केली जात आहे. वरील एमसीए परिपत्रके लक्षात घेता, कृपया नोंद घेण्यात यावी की, टपाल मतपत्रिकेची प्रत आणि प्री–पेड बिझनेस रिप्लाय लिफाफ्यासह नोटिसच्या छापील प्रती सदस्यांना पाठवल्या जाणार नाहीत.

कंपनी/डिपॉझिटरी पार्टीसिपंटस्/रजिस्ट्रार आणि समभाग हस्तांतरण प्रतिनिधी म्हणजेच टीएसआर दाराशॉ कन्सलटंटस् प्रायव्हेट लिमिटेड ('आरटीए') यांच्याकडे **शुक्रवार, मार्च १७, २०२३ (कट–ऑफ तारीख)** ज्या समभागधारकांचे ई–मेल नोंदणीकृत करण्यात आलेले आहे, अशा समभागधारकांना सदर नोटीस मंगळवार, मार्च २८, २०२३ रोजी इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पाठविण्यात आलेली आहे.

ई–मतदानाबाबतच्या सूचनांचा समावेश असलेली सदर नोटीस ही कंपनीचे संकेतस्थळ **www.ceat.com** तसेच स्टॉक एक्सचेंजचे संकेतस्थळ म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या अनुक्रमे **www.bseindia.com** आणि **www.nseindia.com** त्याचबरोबर सीडीएसएलचे संकेतस्थळ अर्थात **www.evotingindia.com** येथेही उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. ज्या सदस्यांना सदर नोटीस प्राप्त झालेली नाही, ते वर उल्लेख केलेल्या संकेतस्थळावरुन ती डाऊनलोड करु शकतात.

सदस्य/लाभधारक मालक (जर समभाग डिमॅट स्वरुपात धारण केलेले असतील) यांना कट–ऑफ तारखेपर्यंत त्याच्याकडे/तिच्याकडे/त्यांच्याकडे कंपनीच्या एकूण भागभरणा झालेल्या समभाग भांडवलाच्या तुलनेत असलेल्या समभागांनुसारच मतांचा अधिकार राहणार आहे. कट–ऑफ तारीखेला म्हणजेच **शुक्रवार, मार्च १७, २०२३** रोजी भौतिक अथवा डिमॅट स्वरुपात समभाग धारण करणारे समभागधारकच ई–मतदानाच्या माध्यमातून मतदान करण्यास पात्र राहतील. कट–ऑफ तारीखेला सदस्य नसलेल्या व्यक्तीने सदर नोटीस ही केवळ त्याच्या माहितीस्तव आहे, असे गृहीत धरावे.

समभागधारकांना आणखी सुचित करण्यात येते की –

क) नोटीसमध्ये नमूद करण्यात आलेले विशेष कामकाज हे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ई–मतदानाआधारे पार पाडले जाणार आहे.

ख) दूरस्थ मतदानाला **बुधवार, मार्च २९, २०२३ ला सकाळी नऊ वाजता** (भा. प्र. वे.) प्रारंभ होणार आहे.

ग) दूरस्थ मतदान **गुरुवार, एप्रिल २७, २०२३ ला सायंकाळी पाच वाजता** (भा. प्र. वे.) समाप्त होणार आहे **(दोन्ही दिवस समावेश).**

घ) इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानासाठी पात्र ठरण्याकरिता कट–ऑफ तारीख मुदत ही **शुक्रवार, मार्च १७, २०२३** निर्धारित करण्यात आलेली आहे.

च) सदस्यांनी यांची नोंद घ्यावी की (i) वर 'ग' कलमात उल्लेख करण्यात आलेली तारीख आणि वेळेनंतर दूरस्थ ई–मतदानाची यंत्रणा मतदानासाठी स्थगित केली जाणार असून त्यानंतर इलेक्ट्रॉनिक पध्दतीने मतदान करण्यास परवानगी दिली जाणार नाही; आणि (ii) सदस्याने ठरावावर आपले मत दिल्यानंतर त्यात कोणताही बदल करण्यात अजिबात परवानगी दिली जाणार नाही.

छ) भौतिक स्वरुपात अथवा डिमॅट स्वरुपात समभाग धारण करणारे अथवा कंपनी/आरटीए यांच्याकडे आपल्या ई–मेलची नोंदणी न केलेल्या सदस्यांसाठी दूरस्थ ई–मतदान करण्याची पध्दत ही सदर नोटीसमध्ये नमूद करण्यात आलेली आहे आणि कंपनीचे संकेतस्थळ www.ceat.com यावरही उपलब्ध आहे.

ज) सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी **गुरुवार, २७ एप्रिल, २०२३ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत (भाप्रवे)** रिमोट ई–व्होटिंग प्रक्रियेद्वारे आपले मत द्यावे आणि त्यांनी जर मतदान केले नाही तर संबंधित सभासदाकडून कोणतेही मत प्राप्त झाले नाही, असे काटेकोरपणे मानले जाईल.

झ) आपल्या ई–मेलची नोंदणी/अद्ययावतीकरण करण्याची पध्दत:

i. कंपनीचे समभाग भौतिक स्वरुपामध्ये धारण करणारे आणि ज्यांनी त्यांचा ईमेल आयडी नोंदणीकृत केलेला नाही, ते सभासद स्व–साक्षांकित आयडीचा पुरावा तसेच पत्त्याच्या पुराव्यासह आणि कंपनीकडे नोंदणी केलेल्या नमुना स्वाक्षरीनुसार रितसर भरलेला गुंतवणूकदार सेवा विनंती फॉर्म (फॉर्म आयएसआर वन) सादर करुन कंपनीच्या आरटीएमध्ये त्यांच्या ईमेलची नोंदणी करु शकतात. गुंतवणूकदार सेवा विनंती फॉर्म संबंधित सभासद आरटीएची वेबसाईट https://www.tcplindia.co.in -> इन्व्हेस्टर सर्व्हिसेस -> डाउनलोड -> फॉर्म -> फॉरमॅट्स फॉर केवायसी यावरून डाउनलोड करु शकतात.

ii. डिमॅट स्वरुपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांना आपले ई–मेल पत्ते संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंटसकडे नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत असून त्यासाठी त्यांनी संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंटसने निश्चित केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.

ञ) दूरस्थ ई–मतदानाद्वारे पार पडलेल्या टपाल मतदानाचा निकाल हा छाननी अधिकाऱ्याचा अहवालासह मंगळवार, मे २, २०२३ रोजी किंवा तत्पुर्वी कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय ४६३, डॉ. ॲनी बेझेंट मार्ग, वरळी, मुंबई – ४०० ०३० येथे जाहीर केला जाणार आहे. मतदानाचा निकाल आणि छाननी अधिकाऱ्याचा अहवाल याची कंपनीच्या समभागांची नोंदणी असलेले बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांना कळविला जाणार आहे. तसेच सदर निकाल हा कंपनीचे संकेतस्थळ **www.ceat.com** तसेच सीडीएसएलचे संकेतस्थळ **www.evotingindia.com** यावरही प्रसिध्द केला जाणार आहे.

तुम्हाला सीडीएसएलच्या ई–मतदान यंत्रणेविषयी काही शंका अथवा समस्या असल्यास, तुम्ही राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक, (सीडीएसएल) सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हीसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल कपाऊंड, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई ४०० ०१३ यांना संपर्क साधावा अथवा **helpdesk.evoting@cdslindia.com** या पत्त्यावर इ–मेल पाठवावा अथवा १८०० २२ ५५ ३३ या टोल फ्री दूरध्वनी क्रमांकवर संपर्क करावा.

ई–मतदानाची अंतिम तारीख म्हणजे **गुरुवार, २७ एप्रिल, २०२३** ही एसएस–२ नुसार ठराव पास होण्याची प्रभावी तारीख मानली जाईल.

टपाल मतदानाच्या नोटिसमध्ये नमूद केलेल्या सर्व नोट्स आणि विशेषतः, दूरस्थ ई–मतदानाद्वारे मतदान करण्याची पद्धत काळजीपूर्वक वाचण्याची विनंती सदस्यांना केली जाते.

सीएट लिमिटेड करिता
सही/–
वल्लरी गुप्ते
कंपनी सचिव

दिनांक: मार्च २८, २०२३
RPG

सूचना

कलाम ट्रान्समिशन लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: ए–५२/६ जी/एफ अली एक्स्टे बदरपूर, नवी दिल्ली–११००४४
CIN NO.: U40106DL2020GOI364104

विद्युत कायदा, २००३ च्या अनुच्छेद १५ च्या उप–अनुच्छेद (२) अंतर्गत

१. कलाम ट्रान्समिशन लिमिटेड, जीचे नोंदणीकृत कार्यालय ए–५२/६ जी/एफ अली एक्स्टे बदरपूर, नवी दिल्ली – ११००४४ येथे आ